अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई — ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक :— २६.०१.२०२३

## - प्रेसनोट -

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ०४/२०२३ |
| ३ | कलम | कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | श्री. गणेश शिवाजी बोंबले, वय ४१ वर्षे, लेखापाल, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ४,०००/- |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४,०००/- |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रुपये ४,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांनी स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या संस्थेची माहिती प्राप्त करण्याकरीता दिनांक ०४/११/२०२२ रोजी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई येथे माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत अर्ज केले होते. परंतु तक्रारदार यांना वेळेत प्रतिसाद न मिळाल्याने नमूद कार्यालयातील लोकसेवक लिपीक आशिष फाजगे यांची भेट घेतली. त्यांनी तक्रादार यांना माहिती अधिकारांतर्गत माहिती पाहिजे असल्यास रु ५,०००/- दयावे लागतील असे सांगुन, कार्यालयातील कॅश काउंटरवर असलेले इंस्पेक्टर श्री गणेश बोंबले यांना भेटून ५,०००/-रू देण्यास सांगितले.<br><br>तक्रारदार यांना सदर माहिती अर्जंट हवी असल्याने ते इंस्पेक्टर श्री गणेश बोंबले यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचे इच्छेविरुध्द १०००/- रू घेवून काही कागदपत्रे दिली व संपुर्ण माहिती हवी असल्यास उर्वरीत ४,०००/- रू लाच दयावी लागेल असे सांगून संपूर्ण माहिती देण्यास नकार दिला. तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी ला.प्र.वि. कार्यालयात समक्ष हजर राहून लोकसेवकाविरुध्द लेखी तक्रार केली.<br><br>प्राप्त तक्रारीस अनुसरुन दिनांक २५/०१/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. गणेश बोंबले यांनी रुपये ४,०००/- लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने तात्काळ सापळा कारवाईचे आयोजन केले असता, सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. गणेश शिवाजी बोंबले यांना लाचेची रक्कम रुपये ४,०००/- फिर्यादीकडुन स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या आलोसाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB

Scanned with OKEN Scanner